वि.दि.दावा.क्र. १५४/२०२३
मंदाबाई वि. रामराव
निशाणी क्र. १०४

वादीतर्फे साक्षीदार क्र. २
मी शपथेवर सांगतो की,

नाव- ज्ञानेश्वर बालाजी उकुन्डे,
वय-५८ वर्षे, धंदा- हातमजुरी,
खंडाळा मरयबी, पोष्ट-ईटगाव,
तह.-पारशिवनी, जिल्हा- नागपुर.

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी.बी.अवचट यांच्यातर्फे सुरु-

मला साक्षसमन्स आले होते. माझी शेती ही खंडाळा येथे आहे. माझ्या शेतीच्या बाजुला रामराव सदाशिव तायवाडे यांची शेती आहे. शेती पुर्वी त्यांच्या वडीलांची म्हणजे सदाशिव यांची होती. रामराव याला तीन मुल अनुक्रमे केवलराम, मोहन आणि हंसराज आणि चार मुली होत्या. सर्वांची नावे मला माहित नाही. मोठा मुलगा केवलराम हा मयत आहे. मुलींची नावे मंदा, चंद्रकला, सत्यफुला आणि चवथी मुलगी हिचे नाव मला आठवत नाही. रावराव यांची शेतजमिन ही वडीलोपार्जीत होती तसेच गावातील घरदेखिल वडीलोपार्जित आहे. रामराव हा शेती करत होता. केवलराम हा शिक्षक म्हणुन काम करत होता. मोहन हा शेती करत होता आणि लहान हंसराज हा शिक्षणाकरीता नागपुर येथे राहत होता.

सरतपास पुर्ण.

साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे -

पुकारा केला असता प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर,
सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI
L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.09.19 11:46:38 +0530

दिनांक १८.०९.२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)